Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 12 | Sept - 2015

# अमरावती जिल्हा परिषदेतील महिलांचा राजकीय सहभाग




*संगीता जी. भांगडिया*
कला महाविद्यालय बडनेरा रेल्वे ता. जि. अमरावती.

### *प्रस्तावना :*

जसाजसा काळ बदलत आहे त्याप्रमाणे सामाजिक स्थितीतही बदल होत आहे. या समाज परिवर्तनाचा परिणाम राजकीय व्यवस्थेवर ही होतो आणि त्याचा परिणाम परत समाज व्यवस्थेवर दिसून येतो हे चक्र आहे. प्रामुख्याने स्त्रियांच्या बाबतीत हे पहायला मिळते.भारत स्वतंत्र भारताचे संविधान अस्तित्वात आले हे तेव्हाच स्त्रियांना राजकिय, सामाजिक , आर्थिक , क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले परंतू राजकीय क्षेत्रात स्त्रिया त्या संधीचा फायदा घेऊ शकल्या नाही. राजकारणातील महिलांचा सहभाग अत्यल्प आणि नाममात्र स्वरूपाचा होता. राष्ट्रीयत्व राज्य स्तरावर महिलांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण अत्यल्प स्वरुपाचे होते. हळूहळू चित्र बदलण्यास सुरवात झाली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ७३ व्या घटना दुरुस्ती पंचायत स्तरावर महिलांना मिळालेले ३३ टक्के आरक्षण व आता ५० टक्के आरक्षण होय. पंचायत स्तरावर आता ' महिला राज आहे असे म्हणतात. सांख्यिकीय दृष्टीकोणातून विचार केल्यास खरोखरच वाटते महिलाराज आहे. महिलांचा पंचायत स्तरावरील सहभाग हा केवळ ५० टक्केच नाही तर त्यापेक्षा जास्त आहे. परंतू केवळ संख्येने महिलांचा प्रमाण अधिक असे खऱ्या अर्थाने म्हणता येत नाहृी. तेव्हा महिलांचा प्रत्यक्ष निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभागाचे अध्ययन करण्याच्या हेतूने अमरावती जिल्हातील जिल्हापरिषदेतील महिला प्रतिनिधीचे अध्ययन केले.



***अभ्यास विषय व व्याप्ती –*** अमरावती जिल्हा परिषदेच्या महिला प्रतिनिधींचा निर्णय निर्धारण प्रकियेतील राजकीय सहभाग हाविषय असून ७३ व्या घटना दूरुस्ती नंतरच्या १९९७ ते २००२ पर्यंतच्या पंचवार्षिक कालखंडा पूरता मर्यादित आहे. त्यावेळी एकूण २४ महिला प्रतिनिधी होत्या.

***गृहितके –***

१) ७३ व्या घटना दुरुस्ती ने महिलांच्या राजकीय कियाशिलतेला गती दिली.

२) जिल्हा परिषदेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत पुरुष प्रतिनिधी पेक्षा महिला प्रतिनिधींचा सहभाग कमी असतो.

जिल्हापरिषदेच्या निर्णय निर्धारन प्रकियेत महिलांचा सहभाग हा अध्ययनाचा केंन्द्रबिंदू असणारा विषय अभ्यासण्यासाठी महिला संदस्यांची सभागृहातील उपस्थिती किती ? सभागृहात त्यांनी किती प्रश्न विचारले? किती ठराव मांडले? ठराव मंजूर करून घेतले काय? या सर्व घटकांचा विचार करून अभ्यास करण्यात आला.

सभागृहात महिला सदस्य जर प्रश्न विचारत असेल तर महिला चौकस विचार करणारी,जिज्ञासू प्रवृत्ती, व सभागृहातील कामकाजाचे ज्ञान असणारी आहे असे आपण म्हणू शकतो. तसेच आपल्या मतदार संघातील प्रश्न समजून त्यासाठी ठराव सभागृहात मांडणे ते मंजूर करुन घेणे व मंजूर झालेल्या ठरावाला केवळ कागदावरच न ठेवता प्रत्यक्षात उतरविणे ही आवश्यक्ता आहे. त्यासाठी जिल्हापरिषदेतील प्रशासकिय अधिकाऱ्यांना भेटून काम प्रत्यक्षात करून घ्यावे लागते. तेव्हाच महिलांचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग खरा मानला जाईल या दृष्टीकोणातून अमरावती जिल्हा परिषदेतील महिला सदस्यांच्या कार्याचा अभ्यास करण्यात आला.

आपला राजकीय सहभाग दर्शविण्यासाठी महिला प्रतिनिधींची उपस्थिती आवश्यक आहे. जिल्हा परिषदेच्या होणाऱ्या सभेत महिला प्रतिनिधीची उपस्थिती जास्तीत जास्त आढळून आली.

### अरावती जिल्हा परिषदेतील निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांचा सहभाग

| | एकूण | स्त्री प्रतिनिधी | टक्के | पुरुष प्रतिनिधी | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| सभागृहात विचारलेले प्रश्न | २४८० | ४१६ | २० | १९८४ | ८० |
| मांडलेले प्रश्न | ४७१ | १०६ | २२.५० | ३६५ | ७७.५० |
| संमत झालेले ठराव | ४७६ | १०६ | १०० | ३६१ | ९८.९० |
| मंजूर ठरावांची अंबलबजावणी | ४५१ | १०१ | ९८.२८ | ३५० | ९५.८६ |

वरील सारणीचे अध्ययन केल्यास असे दिसून येते की अमरावती जिल्हा परिषदेत १९९७ते २००२ या काळात एकून २४८० प्रश्न विचारण्यात आले त्यापैकी ४९६ प्रश्न महिला प्रतिनिधी तर १९८४ प्रश्न पुरुष प्रतिनिधींनी विचारले आहे. त्यांचे प्रमाण क्रमश २० व ८० आढळून आहे. तात्पर्य प्रश्न विचारल्या संदर्भात स्त्री प्रतिनिधींचा सहभाग पूरूष प्रतिनीधीच्या तूलनेत अतिशय कमी आहे.

त्याच प्रमाणे जिल्हा परिषदेच्या सर्व साधारण सभेत मांडलेल्या एकून ४७१ ठरावांपैकी १०६ ठराव महिला प्रतिनिधी मांडले त्याच प्रमाण २२.५० असल्याचे आढळून आले. तर ३६५ ठराव पुरूष सभासदांनी मांडले त्याचे प्रमाण ७७.५ असल्याचे दिसून येते. या बाबतीतही पूरूष प्रतिनिधी महिला प्रतिनिधी पेक्षा अधिक ठराव मांडलेले आढळले. ठराव मंजूर करून घेणे व त्यांची अमंलबजावणी करण्याबाबत महिला प्रतिनिधींचे कार्य पुरुष प्रतिनिधी बरोबरीचे दिसून आले आहे. या जिल्हातील काही महिला प्रतिनिधीची कामगीरी उल्लेखनिय राहिलेली आहे.

अमरावती जिल्हा परिषदेच्या महिला सदस्य सौ. सुरेखाताई ठाकरे ह्या १९९० पासून राजकारणात आहे. जिल्हा परिषद सभागृहात महिला सदस्यांद्वारे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नापैकी सर्वाधिक प्रश्न त्यांच्याद्वारे विचारल्या गेले. त्यांनी पाणी टंचाई, अंगणवाडी आहार, बालकांच्या आरोग्या संदर्भात, पुरग्रस्तांना मदत देण्याबाबत, अंगणवाडी बांधकाम संदर्भात असे अनेक प्रश्न, ठराव सभागृहात मांडले. हे कार्य पुर्णत्वास नेण्यासाठी वेळोवेळी त्यांनी विविध प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या तसेच शिराळा मतदार संघातील प्रतिनिधी सौ. कोकिळाताई काळमेघ यांचे देखील दारुबंदी विषयी कार्य उल्लेखनिय आहे. त्या आरक्षणामुळे राजकारणात आल्या नाही. तर त्यांच्या सामाजिक कार्याची पोच पावती म्हणून जनतेने त्यांना निवडले.

### निष्कर्ष –

१) अमरावती जिल्हा परिषेदच्या विकास कार्यात महिलांचा सहभाग अभ्यासतांना एक बाब प्रकर्षाने जाणवली की महिला प्रतिनिधी पुरुष प्रतिनिधीच्या तुलनेत सभागृहात वक्तशीर हजर राहण्याबाबत जागरुक होत्या.
२) जिल्हा परिषदेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेंत पुरुष प्रतिनिधीच्या तुलनेत महिला प्रतिनीधींचा – सहभाग अंत्यल्प स्वरूपाचा होता.
३) महिलांनी केलेल्या कार्यामुळे जिल्हा परिषेदच्या विकास कार्याला गती मिळाली.

वरिल अभ्यासावरून असे म्हणता येईल की पुरुषांच्या तुलनेत महिलांचे निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग कमी असला तरी तो दुर्लक्षित करण्यासारख्या निश्चितच नाही.महिलांना योग्य वातावरण, संधी व प्रोस्ताहन मिळाल्यास त्या निरपेक्ष,निष्पक्ष, निर्भिडपणे व स्वच्छ प्रतिचे राजकिय कार्य करू शकतात.

### गृहित कृत्यांची पडताळणी

१) ७३ व्या घटना दुरुस्ती ने महिलांच्या राजकिय क्रियाशिलतेला गति दिली.हे गृहितक काही प्रमाणात सिध्द झाले आहे असे दिसून येते. ७३ व्या घटना दुरुस्तीने केवळ महिला प्रतिनिधींची संख्यात्मक रित्याच वाढ झाली नाही तर महिला मध्ये असणाऱ्या नेतृत्व क्षमता, निर्णयक्षमतेला प्रदर्शित करण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली. काहि महिला प्रतिनिधींनी मिळालेल्या संधीचे सोने केले.
२)जिल्हा परिषदेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत पुरुष प्रतिनिधी पेक्षा महिला प्रतिनिधींचा सहभाग कमी असतो. हे गृहितक पुर्णत सत्य आहे.

### उपाययोजना –

१) महिला प्रतिनिधींचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी सर्व प्रथम पुरुष मंडळींनी आपला दृष्टीकोण बदलने गरजेचे आहे.
२)महिलांना उमेदवारी देतांना गुणात्मक दर्जा पाहून दिली जाईल. तेव्हाच महिला राजकारणाला चांगले दिवस येईल.
३)महिलांनी आपल्या नकारात्मक दृष्टिकोनात बदल करण्याची गरज आहे.
४)महिलांना राजकिय सहभागाच्या संधी बरोबर राजकीय प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे.

आज लोकशाही समाजव्यवस्थेत सभोवतालच्या बदललेल्या परिस्थितीचा कळत नकळत महिलांवर परिणाम होत आहे. परंतू निरनिराळे राजकिय पक्ष महिलांचा फायदा फक्त आपल्या पक्ष हिताकरिता न करता त्यांच्या समस्या सोडवून विकासाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी प्रामाणिक व हेतूपुर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे. तरच महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकिय विकासाला चालना मिळून त्यांच्यातील अलिप्तपणाची व न्यूनगंडाची भावना दुर होईल. त्यांच्यात जाणीव जागृत निर्माण होऊन प्रत्येक क्षेत्रातील त्यांचा सक्रिय सहभाग वाढेल.

